सकाळ
सातारा, सोमवार,
२ फेब्रुवारी २०१५
३

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

सकाळ

# ॲड. शिंदेंचे गांधीवादी विचार अखंड मार्गदर्शक

## रामराजे ; शोकसभेत भारावलेल्या अंतःकरणाने मान्यवरांची आदरांजली



सातारा : रयतचे कार्याध्यक्ष (कै.) डॉ. रावसाहेब शिंदे यांना आदरांजली वाहण्यासाठी रविवारी सायन्स कॉलेजच्या सभागृहात आयोजित शोकसभेत बोलताना रामराजे नाईक-निंबाळकर, त्यावेळी डॉ. अनिल पाटील, डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, डॉ. गणेश ठाकूर आदी. (प्रमोद इंगळे : सकाळ छायाचित्रसेवा)

**सातारा, ता. १ :** ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या रूपाने प्रति कर्मवीर अण्णांसारखे नेतृत्व रयत परिवारास मिळाले. कर्मवीरांनी लावलेल्या 'रयत'रुपी वटवृक्षाच्या कक्षा रूंदावण्यात त्यांचे मोठे योगदान होते. अशा कर्मयोगीस समाज मुकला आहे. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील त्यांचे गांधीवादी विचार समाजाला अखंड मार्गदर्शक ठरतील, असे मत माजी मंत्री रामराजे नाईक-निंबाळकर यांनी व्यक्त केले.

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांना आदरांजली वाहण्यासाठी येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या सभागृहात शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे उपकार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, डॉ. शैला दाभोळकर, रयतचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर आदी उपस्थित होते.

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर म्हणाले, आदर्श मित्र, मार्गदर्शक आणि गुरू असणाऱ्या ॲड. रावसाहेब शिंदे यांच्यासारख्या महामानवास समाज मुकला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील आणि यशवंतराव चव्हाण यांच्या त्रिवेणी विचारसरणीनुसार आयुष्यभर वावरणारे ॲड. शिंदे ही तळपती मुद्रा होते. ते हरविल्याचे दुःख सदैव आमच्या मनात राहील.डॉ. अनिल पाटील म्हणाले, '१९७६ पासून रयतच्या जडणघडणीत जबरदस्त योगदान देणारे आणि कर्मवीरांच्या कुटुंबीयांचे सदस्य असणाऱ्या ॲड. शिंदे यांच्या विचारांचा वारसा सदैव जोपासला जाईल.'

डॉ. शैला दाभोळकर म्हणाल्या, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील आणि साधनाचा सच्चा विवेकी साथीला समाज मुकला आहे.

डॉ. गणेश ठाकूर यांनी ॲड. रावसाहेब शिंदे यांनी ४० वर्षांहून अधिक काळ कर्मवीरांच्या विचारांनी रयतचे कार्य वाढविले, असे सांगून ॲड. शिंदे यांनी लिहिलेले इच्छापत्र वाचून दाखविले. मोहनराव कदम यांनी संपूर्ण आयुष्यभर सज्जन असणारे आदर्श व्यक्तिमत्त्व स्वतःच्या कृतीतून जोपासणारे ॲड. रावसाहेब शिंदे हा सच्चा समाजसेवक आपल्यातून निघून गेल्याचे दुःख व्यक्त केले.

यावेळी रयतचे सहसचिव प्राचार्य डॉ. डी. डी. पाटील, डॉ. अरविंद बुरुंगले, कऱ्हाड शिक्षण मंडळाचे मुकुंद कुलकर्णी, बाबूराव शिंदे, विजयराव कोलते, हरिभाऊ माने, प्रा. संभाजीराव पाटणे आदींनी ॲड. शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडत आदरांजली वाहिली. महाराजा सयाजीराव विद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.